1/0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** मुंब्रा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1147 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/12/2022 02:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/12/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/12/2022
**Time From (वेळेपासून):** 13:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/12/2022 **Time (वेळ):** 00:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/12/2022 00:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुंब्रा पोलीस स्टेशन, मुंब्रा,ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** एजाज खालीक शेख

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** खालीक शेख

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राम मारूती रोड,ठाणे पश्चिम,ठाणे ,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राम मारूती रोड,ठाणे पश्चिम,ठाणे ,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9773111412

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश गंगाराम लाहीगुडे | | | 1. नंबर 303,सेक्टर-20, ,सी विंग, सुरभी धाम बिल्डीग, ऐरोली,नवीमुंबई ,मुंब्रा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पडताळणी करून सापळा पंचनामा नंतर दाखल

**9. Particulars of properties of interest (संबंधित मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-1)

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, श्री एजाज खालीक शेख, वय40वर्षे, व्यवसाय-नोकरी, एज्युकेशन कांॅनसीलर,(इमार्टीकस लर्नींग), कार्या. राम मारूती रोड, ठाणे पश्चिम, जि.ठाणे, राहणार:-रूम नंबर 02, शकुराबाई चाळ नंबर14, परेल पोस्टआॅफीस लेन, डाॅ.बी.ए.रोड,मुंबई 12 मो.9773111412.

मी वरील पत्त्यावर 40 वर्षापासुन माझे परिवारासह राहणेस आहे व राम मारूती रोड, ठाणे पश्चिम, जि. ठाणे, येथे इमार्टीकस लर्नींग इन्सटीटयुटमध्ये एज्युकेशन कांॅन्सीलर म्हणुन नोकरी करतो.

माझी पत्नी सौ. नौसिन अजहर खान, वय. 30 वर्षे, राहणार- फ्लॅट नंबर 105, पहिला माळा, बिल्डींग नंबर अे-2, म्हाडा काॅलनी, शिमलापार्क, कौसा, मुंब्रा, ठाणे हिने माझे विरूध्द दिलेल्या तक्रारीवरून मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा रजि.नंबर 0980/2022, भा.दं.वि.कलम 498 अ, 323, 504 सह हुंडाबळी अधिनियम 1961 चे कलम 4 प्रमाणे दिनांक 19/10/2022 रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

वर नमुद गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने मला तपास अधिकारी श्री. आर.जी.लाहिगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर यांनी त्यांचे कडील, जावक क्रमांक 13933/2022, दिनांक 24/10/2022 रोजीची तपासकामी हजर राहणेबाबतची फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 41(अ)(1)अन्वयेची पोस्टाने पाठविलेली नोटीस दिनांक 27/10/2022 रोजी मला माझे घरच्या पत्त्यावर प्राप्त झाली. नोटीस प्राप्त झाल्याचे तारखेपासुन दोन दिवसांत तपासकामी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे हजर राहणेबाबत नोटीसद्वारे मला कळविण्यात आले होते.

त्या अनुशंगाने मी दिनांक 28/10/2022 रोजी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गेलो असता, त्यादिवशी माझी तपास अधिकारी श्री.आर.जी.लाहिगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची भेट झाली नाही. म्हणुन मी दिनांक 30/10/2022 रोजी पुन्हा तपास अधिकारी श्री.आर.जी.लाहिगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, यांना भेटण्यासाठी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गेलो. त्यावेळी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे माझी त्यांचेशी भेट झाली व त्यावेळी त्यांनी मला माझे विरूध्द दाखल गुन्हयाबाबत सांगुन, मी सर्व बघुन घेतो असे बोलुन, नमुद गुन्हयात अटकपुर्व जामीनासाठी न्यायालयात न जाण्याबाबतच्या मला सुचना दिल्या व हे मॅटर प्राप्त झाल्यावर 15 दिवसानंतर मी तुला पोलीस स्टेशनला बोलावुन घेतो. त्यावेळी काय करायचे ते मी तुला सविस्तर सांगतो. असे मला श्री.लाहिगुडे साहेबांनी सांगितले. त्यानंतर मी माझे घरी निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक 16/11/2022 रोजी मला माझे मोबाईल फोनवर, श्री.लाहिगुडे यांचा मोबाईल फोन नंबर 7039004027 या क्रमांकावरून, 12ः37 वाजता फोन आला. त्यावेळी त्यांनी मला, तुझी पत्नी नौसीन मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये येवुन खुप गोंधळ घालते, तरी तु लवकरात लवकर मुंब्रा पोलीस स्टेशनला येवुन मला भेट. त्यावेळी मी त्यांना, बाहेर आलो असल्याचे सांगुन, तुम्हाला एक-दोन दिवसांत मुंब्रा पोलीस स्टेशनला येवुन भेटतो असे सांगुन, फोन कट केला.

त्यानंतर पुन्हा दिनांक 19/11/2022 रोजी सायंकाळी 05ः58 वाजता श्री.लाहिगुडे साहेबांचा मला फोन आला व त्यांनी मला दिनांक 20/11/2022 रोजी सकाळी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे मी येतो असे सांगुन फोन कट केला.

त्यानंतर दिनांक 20/11/2022 रोजी सकाळी 09ः30वाजता मी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जावुन श्री.लाहिगुडे साहेबांना भेटलो. त्यावेळी श्री.लाहिगुडे साहेबांनी मला, ''तुझ्या विरूध्द दाखल असलेल्या 0980/2022, भा.दं. वि.कलम 498 अ, 323, 504 सह हुंडाबळी अधिनियम 1961 चे कलम 4 प्रमाणे या गुन्हयात, रेप केसचे कलम 376 हे लावुन, गुन्हयात अटक करणार असल्याचे'' मला त्यांनी सांगितले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, ''ती तर माझी पत्नी आहे, त्यामुळे माझे विरूध्द रेप केस कशी काय लागेल? असे विचारले असता, श्री.लाहिगुडे साहेबांनी मला, ''ते मला काही माहित नाही, तुझ्यावर 376 प्रमाणे कारवाई करून तुला जेलला पाठविणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना, तसे न करण्याबाबत खुप विनंती केली. परंतु श्री.लाहिगुडे हे

मुंब्रा पोलीस स्टेशन ठाणे



काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. उलट त्यांनी माझे विरूध्द भा.दं.वि. कलम 376 प्रमाणे कारवाई न करण्यासाठी माझे कडे 80,000/- रू. लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगितले. परंतु, त्यांनी माझे काही एक ऐकले नाही व तुझ्यावर 376 प्रमाणे कारवाई होवु नये, असे वाटत असेल तर तुला मला 80 हजार रू. दयावेच लागतील नाहीतर तुला मी रेप केस व आयटी अॅक्टमध्ये अडकवीन. अषी धमकी दिली व लवकरात लवकर पैषांची व्यवस्था करून मुंब्रा पोलीस स्टेशन येथे भेटण्यास येण्यास सांगितले. त्यानंतर मी माझे घरी निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक 28/11/2022 रोजी मला, माझे विरूध्द दाखल असेलला गुन्हा रजि.नंबर 0980/2022, भा.दं.वि.कलम 498 अ, 323, 504 सह हुंडाबळी अधिनियम 1961 चे कलम 4 प्रमाणे या गुन्हयात मा. न्यायालयाने, गुन्हयाचे दोशारोपत्र दाखल होई पर्यंत प्रत्येक महिन्याचे 01 व 16 तारखेला मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जावुन हजेरी लावण्याच्या अटी व शर्तीवर जामीनावर मुक्त केले.

त्यानंतर दिनांक 29/11/2022 रोजी 12ः20 वाजता श्री. लाहिगुडे साहेबांचा मला फोन आला. त्यावेळी त्यांनी मला, तुझी बायको मुंब्रा पोलीस स्टेशन येथे येवुन, खुप गोंधळ घालते, तसेच वारंवार वरिष्ठांना जावुन भेटते. तरी, मी तुला त्यादिवषी सांगितल्या प्रमाणे, पैशांची व्यवस्था करून, लवकरात लवकर मला येवुन भेट. असे बोलुन त्यांनी माझेकडे पुन्हा लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना, आता मी बाहेर आलेलो आहे. मला मा.न्यायालयाने गुन्हयाचे दोशारोपपत्र जाई पर्यंत प्रत्येक महिन्याचे 01 व 16 तारखेला मुंब्रा पोलीस स्टेषन येथे हजेरी लावण्याचे आदेष दिलेले आहेत. त्याप्रमाणे मी दिनांक 01/12/2022 रोजी दुपारी 03 वाजता हजेरीकामी मुंब्रा पोलीस स्टेशनला येणार आहे. त्यावेळी मी तुम्हाला येवुन भेटतो असे सांगितले. त्यानंतर मी फोन ठेवुन दिला.

तरी माझेविरूध्द भा.द.वि.कलम 376 प्रमाणे कारवाई न करण्यासाठी लोकसेवक श्री.आर.जी.लाहिगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेषन, ठाणे शहर यांनी माझेकडे 80,000/- रू. लाचेची मागणी केलेली आहे व त्यांना लाचेची रक्कम देण्याची माझी ईच्छा नाही. म्हणून त्यांचे विरूध्द कारवाईकरणेकरीता दिनांक 30/11/2022 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली आहे.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने दिनांक 01/12/2022 रोजी सर्व कायदेशीरबाबींचा अवलंब करुन, डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर लावून पंच साक्षीदार श्री. प्रज्ञेश पाटकर, लिपिक/टंकलेखक, आदीवासी विकास विभाग, ठाणे यांचे उपस्थितीत लोकसेवक श्री. लाहीगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, यांचेविरूध्द मुंब्रा पोलीस स्टेषन, ठाणे शहर याठिकाणी केलेल्या पडताळणी कारवाईत, माझेविरूध्द भा.द.वि.कलम 376 व आय.टी. अॅक्ट प्रमाणे कलम लावून कारवाई न करण्यासाठी लोकसेवक श्री. लाहीगुडे यांनी स्वतःसाठी तडजोडीअंती माझेकडून 35,000/- रुपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. सदरची लाचेची रक्कम तसेच माझेविरूध्द दाखल गुन्हयांचे अनुषंगाने सविस्तर स्टेटमेंट घेवून मला दिनांक 02/12/2022 रोजी सायंकाळी मुंब्रा पोलीस स्टेषन येथे येवून भेटण्यास सांगितले होते. परंतू सदरचे स्टेटमेंट माझे वकील मला दोन दिवसात म्हणजेच दिनांक 05/12/2022 रोजी देणार असल्याने, लोकसेवक श्री.लाहीगुडे यांचेविरूध्द पुढील सापळा कारवाई दिनांक 05/12/2022 रोजी करण्याबाबत पोनि ढगे पाटील, अॅसीबी, ठाणे यांना मी दिनांक 01/12/2022 रोजीच्या पडताळणी पंचनामा दरम्यान विनंती केली होती.

त्यानंतर दिनांक 04/12/2022 रोजी संध्याकाळी माझे मोबाईल फोनवर लोकसेवक श्री. लाहीगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेषन, ठाणे शहर यांचा फोन आला व त्यांनी मला दिनांक 05/01/2022 रोजी सकाळी 11ः00 ते 12ः00 वाजेच्या दरम्यान लाचेची रक्कम व स्टेटमेंट घेवून मुंब्रा पोलीस स्टेषन येथे भेटण्यास सांगितले. सदरबाबत मी पोनि ढगे पाटील यांना कळविले असता, त्यांनी मला दिनांक 05/12/2022 रोजी सकाळी 08ः00 वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक 05/12/2022 रोजी सकाळी 09ः00 वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे पोनि ढगे पाटील यांचे कॅबिनमध्ये हजर झालो. त्यावेळी पो.नि.ढगे-पाटील यांनी मला लोकसेवक श्री.आर.जी.लाहिगुडे, सपोनि मुंब्रा पोलीस स्टेशन यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देणसाठी 35,000/- रू. आणले आहेत काय? असे विचारले असता, मी त्यांना होय म्हणून सांगून लाचेच्या कारवाईकामी 35,000/-रु. पोनि ढगे पाटील यांच्याकडे हजर केले. मी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 70 नोटाचे नंबर्स नोदवून त्या सर्व नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून, त्याचे प्रात्यक्षिक अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात करून दाखवून सविस्तर सापळापुर्व पंचनामा कारवाई करण्यात आली. व अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा माझे नेसूस पॅन्टच्या खिषात ठेवल्या. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून, लोकसेवक श्री. लाहीगुडे, सपोनि, मुंब्रा पोलीस स्टेषन यांचेविरूध्द नियोजित सापळा कारवाईकामी मुंब्रा पोलीस स्टेषन येथे मी व पंच श्री. पाटकर असे माझे टुव्हीलरने व उर्वरीत सापळा पथक असे भाडोत्री रिक्षाने जाण्याचा निर्णय पोनि ढगे पाटील यांनी घेतला.

त्यानंतर पोहवा/पोटे यांनी डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर सुरू करून, माझे शर्टचे आतील बनियानमध्ये लावल्यानंतर मी व पंच श्री. प्रज्ञेष पाटकर असे आम्ही माझे अॅक्टीव्हा टु व्हीलर मोटर सायकल क्रमांक एम.एच. 01.सी.एस.6327 या वाहनाने लोकसेवक श्री.लाहिगुडे, सपोनि यांची भेट घेण्याकरीता पारसिकनगर, नेचर ग्लोरी, फेज थ्री, येथुन निघुन मुंब्रा पोलीस स्टेशनच्या दिशेने गेलो. त्याचवेळी माझे वाहनाचे पाठोपाठ उर्वरित सापळा पथक भाडोत्री रिक्षाने, मुंब्रा पोलीस स्टेशनच्या दिषेने निघाले. काही वेळातच आम्ही मुंब्रा पोलीस स्टेशन येथे पोहचलो. त्यावेळी उर्वरित सापळा पथक देखील मुंब्रा पोलीस स्टेषन येथे पोहचले व मुंब्रा पोलीस स्टेशनचे आवारात सापळा लावुन थांबुन राहिल्याचे मला दिसले. त्यानंतर मी व पंच श्री.पाटकर असे आम्ही दोघेही लोकसेवक श्री.लाहिगुडे, सपोनि यांची भेट घेण्याकरीता ते ज्या ठिकाणी बसतात, त्या ठिकाणी त्यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी सदर केबीनमध्ये लोकसेवक श्री.लाहिगुडे, सपोनि हे उपस्थित होते व ते त्यांचे मोबाईल फोनवर कोणाषी तरी बोलत होते. त्यानंतर मी ापंच श्री.पाटकर यांना केबीनचे बाहेरच थांबुन राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते केबीनचे बाहेर थांबुन राहिले. त्यानंतर मी केबीनमध्ये गेल्यावर मला लाहिगुडे, सपोनि यांनी स्टेटमेंट आणले का? याबाबत विचारले असता मी त्यंाना होय म्हणुन मी आणलेले स्टेटमेंट दाखलले. त्यानंतर त्यांनी यामध्ये सर्व व्यवस्थित लिहीले आहे ना असे विचारले असता, मी होय हे लाॅयरनेच लिहिले असल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर लाहिगुडे, सपोनि व माझेत रूमचे डिपाॅझीटबाबत बोलणे झाले. त्यानंतर लाहिगुडे, सपोनि यांनी माझे विरूध्दचे गुन्हयाचे चार्जशीट चार दिवसांत लावतो कोर्टात असे म्हणाले व माझे विरूध्द 376 व आय.टी.अॅक्ट चे कलम लावले असते तर जामीन झाला नसता असे म्हणाले. 376 लावला असता, तर त्याप्रमाणे तपास करावा लागला असता, तिचे स्टेटमंेट घ्यावे लागले असते, तुम्हाला अटक करावे लागले असते, असे लाहिगुडे, सपोनि मला म्हणाले. त्यावर मी त्यांना माझेजवळ ऐंषी हजार रूपये नव्हते म्हणुन मी घाबरलो होतो असे सांगितले. त्यानंतर लाहिगुडे, सपोनि यांनी मला सोबत कोण आहे याबाबत विचारले असता, मी त्यांना आॅफीसमधला सलीम आहे असे, पंचांना उद्देषुन म्हणालो. त्यानंतर लाहिगुडे, सपोनि यांनी मला बरं आणा पटकन, किती केलेत असे विचारले असता, मी त्यांन पुर्ण पसतीस हजार रूपये असल्याचे सांगितले. आणि काही प्राॅब्लेम होणार नाही मला याची गॅरन्टी दया असे त्यांना म्हणालो असता, त्यांनी गॅरंटी देतो असे म्हणुन माझे विरूध्द 504 व 406 व्यतिरिक्त कोणतेच कलम वाढवलेलं नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 406 हे कलम काढता नाही का येणार ? असे विचारले असता, तिने दागिने दिलेे आहेत, असे लाहिगुडे, सपोनि बोलले .त्यावर मी त्यांना मला त्यांनी दागिने दिलेच नाही. असे म्हणालो. त्यावर लाहिगुडे, सपोनि यांनी 376, आय.टी. अॅक्ट ही काही साधीसुधी कलमं नाही असे म्हणुन लवकरात लवकर चार्जषीट टाकतो दोन तीन दिवसांत असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना देऊ का पैसे असे विचारून मी माझे पॅन्टचे पुढील उजवे खिषात ठेवलेली 35,000/- रू. लाचेची रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन ती लाहिगुडे, सपोनि यांचे समोर धरली ती त्यांनी त्यांचे उजवे हाताने घेतली व पुर्ण पस्तीस आहेत का असे विचारून, त्यांचे पॅन्टचे पुढील उजवे खिशात ठेवली. त्यावेळी मी त्यांना मोजुन घ्या असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना इतर विशयात बोलण्यात बिझी ठेवुन, माझे मोबाईल फोनवरून पो.नि.ढगे-पाटील यांना मिस्ड काॅल देवुन, पुर्व नियोजीत ईशारा केला. त्यानंतर लागलीच पो.नि.ढगे-पाटील व त्यांचे पाठोपाठ पंच नंबर 1 श्री. पाटकर असे लोकसेवक लाहिगुडे, सपोनि यांचे केबीनमध्ये आल्या. त्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांनी लोकसेवक लाहिगुडे, सपोनि यांना स्वतःची तसेच पंच श्री.पाटकर यांची ओळख सांगितल्यानंतर, तक्रारदार श्री.एजाज शेख यांचेकडुन स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली आहे ? याबाबत लाहिगुडे, सपोनि यांना विचारणा केली असता, लोकसेवक श्री. लाहिगुडे, सपोनि यांनी लाचेची रक्कम त्यांचे नेसुस पॅन्टच्या पुढील उजवे खिषात ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांचे सुचनेवरून पंच श्री.पाटकर यांनी लोकसेवक श्री. लाहिगुडेे, सपोनि यांचे नेसुस पॅन्टच्या पुढील उजवे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम काढुन त्या चलनी नोटा त्यांचे दोन्ही हाताने मोजुन पाहिल्या असत्या त्यात 500/- रुपये दराच्या 70 चलनी नोटा असे एकुण 35,000/-(पसतीस हजार रूपये) आढळुन आले. त्याचवेळी सदर ठिकाणी उर्वरित सापळा पथक आतमध्ये आल्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांचे सुचनेप्रमाणे पोहवा/कोळी यांनी लाहिगुडे, सपोनि यांचा उजवा हात व पंच नंबर 1 श्री.पाटकर यांनी डावा हात मनगटाजवळ घट्ट पकडुन ठेवले. त्यानंतर पो.नि.ढगे-पाटील यांनी लोकसेवक श्री. लाहिगुडे, सपोनि यांना सर्वांची ओळख करून देवुन लाचेची रक्कम स्विकारणाऱ्या लोकसेवक श्री. लाहिगुडे, सपोनि यंाना पुढील कारवाईकामी 11ः10 वाजता ताब्यात घेतले.

त्यानंतर हस्तगत केलेल्या नोटांची, लोकसेवक श्री. लाहीगुडे, सपोनि यांचे नेसूस पॅन्टचे पुढील उजवे खिशाची व लोकसेवक श्री. लाहीगुडे, सपोनि यांचे उजवे हाताचे बोटाचे अॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता, त्यावर अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म आढळून आले.

तरी मी दिनांक 30/11/2022 रोजी लोकसेवक श्री. रमेष गंगाराम लाहीगुडे वय 52 वर्षे, पद- सहाय्यक पोलीस निरीक्षक, वर्ग-2, नेमणूक मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर राह. रूम नंबर 303, तिसरा माळा, सी विंग, सुरभी धाम

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

बिल्डींग, सेक्टर-20, ऐरोली, नवीमुंबई यांचेविरूध्द लाचेची मागणी करत असलेबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक 01/12/2022 रोजी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत, माझेविरूध्द मुंब्रा पोलीस स्टेषन येथे दाखल असलेला गुन्हा रजिस्टर नंबर 980/2022, भादवि 498 अ, 323, 504 सह हुंडाबळी अधिनियम 1961 चे कलम 4 प्रमाणे या गुन्हायांत कलम 376 व आय.टी अॅक्ट प्रमाणे वाढीव कलम न लावणेसाठी तडजोडीअंती माझेकडे 35,000/-रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांचेविरूध्द दिनांक 05/12/2022 रोजी आजमाविण्यात आलेल्या सापळा पंचनामा कारवाईत, लोकसेवक श्री. लाहीगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर यांनी माझेकडून 35,000/-रु. लाचेची रक्कम स्विकारली असतांना त्याना मुंब्रा पोलीस स्टेशन, येथील आॅफिसर रुममध्ये 11ः10 वाजता रंगेहाथ पकडण्यात आले. तरी माझी त्यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद असून, त्यांचेविरूध्द कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीतून संगणकावर टंकलीखीत करण्यात आली असुन ती वाचून मला हिंदीतून समजावून सांगण्यात आली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAMDASH BABURAO SHEDGE
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार,
मुंब्रा पोलीस स्टेशन,
ठाणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Ashok Narayan Kac
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH81236